सकाळ

# आळे येथील चार विद्यार्थ्यांची सायबर सुरक्षा अभियानासाठी निवड

**आळेफाटा, ता. १६ :** आळे (ता. जुन्नर) येथील ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळ संचलित बाळासाहेब जाधव महाविद्यालयातील बीसीए व बीएस्सी (संगणक शास्त्र) विभागातील चार विद्यार्थ्यांची सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियानासाठी निवड करण्यात आली. क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने हे अभियान राबविण्यात आले.

साक्षी नेहेरकर(प्रसिडेंट), मोहिनी जगताप (सेक्रेटरी), ऋतू नेहरकर (ॲक्टिव्हिटी डायरेक्टर), शोएब शेख (पी.आर.मेडिया डायरेक्टर) या विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसर म्हणून निवड केली आहे. विद्यार्थ्यांचे ट्रेनिंग व ओरिएंटेशन विमाननगर (पुणे) येथील कंपनीच्या ऑफिसमध्ये घेतले. ट्रेनिंग सेशनदरम्यान विद्यार्थ्यांना अजय शिर्के, गायत्री केसकर-पवार यांनी मार्गदर्शन केले. कंपनीच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



**आळे (ता. जुन्नर) :** सायबर शिक्षा फॉर सुरक्षा अभियानासाठी निवड झालेले विद्यार्थी.

निवड झालेले विद्यार्थी प्रकल्पासाठी सामाजिक घटकांना मार्गदर्शन करून त्यांच्यात सायबर सुरक्षेबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे काम करणार आहेत, तसेच विभागप्रमुख प्रा. नूतन जोशी यांची या अभियानासाठी शिक्षक समन्वयक म्हणून निवड केली.प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव प्रकल्पाबद्दल सांगताना म्हणाले, ‘‘निवड झालेले विद्यार्थी शैक्षणिक संकुलाच्या सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्याचे काम करणार आहेत.’’

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, बाळासाहेब जाधव, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे, किशोर कुऱ्हाडे, भाऊ कुऱ्हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबू कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके, प्रदीप गुंजाळ, देविदास पाडेकर, सम्राट कुऱ्हाडे, रमेश कुऱ्हाडे, शांताराम कुऱ्हाडे यांनी शुभेच्छा दिल्या.

Pune, District-Today
17/06/2025 Page No. 5